G61/BPS903/EE/20160602

वेळ : 3 तास **गुण : 80**

विद्यार्थ्यांसाठी सूचना :

1. विभाग A वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा आहे. त्याची उत्तरे उत्तरपत्रिका / OMR Sheet वर नोंदवायची आहेत.

2. OMR Sheet वरील चार पर्यायांपैकी अचूक पर्यायाखालील वर्तुळ काळ्या पेनाने पूर्ण भरावे. वर्तुळ अर्धवट भरल्यास अथवा एका प्रश्नास जास्त वर्तुळ भरल्यास ते उत्तर चुकीचे समजले जाईल.



A B C D

उत्तराची अयोग्य नोंद



A B C D

उत्तराची योग्य नोंद

3. बहुपर्यायी प्रश्नांमध्ये सर्वात अचूक उत्तरे नोंदविणे अपेक्षित आहे.

4. विभाग B वस्तुनिष्ठ विनापर्यायी स्वरूपाचा आहे. त्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिली आहे.

5. विभाग C हा दीर्घोत्तरी स्वरूपाचा असून आवश्यक तेथे नकाशा व आकृत्या काढणे अपेक्षित आहे.

6. विभाग A साठी प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी 1/3 उणे गुण पद्धत लागू नाही.

7. विभाग B आणि C विभाग साठी उणे गुण पद्धत लागू नाही.

SECTION - A (गुण : 24)

या विभागात एकूण 48 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला अर्धा गुण याप्रमाणे हा विभाग 24 गुणांचा आहे. या विभागाला 1/3 उणे गुणपद्धत लागू आहे.

1. स्वतंत्र भारतातील कोणत्या राज्याने प्रथम पंचायत राज ही योजना स्वीकारली?
   a) महाराष्ट्र b) गुजरात
   c) कर्नाटक d) राजस्थान

2. भारतातील पहिली महानगरपालिका कोणत्या शहरात स्थापन करण्यात आली.
   a) मुंबई b) कलकत्ता
   c) मद्रास d) दिल्ली

3. खालीलपैकी कोणते पंचायती राजचे उद्दिष्टे नाही.
   a) सत्तेचे केंद्रीकरण व्हावे
   b) जनतेचा राज्यकारभारात सहभाग वाढावा
   c) सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे
   d) जनतेला लोकशाहीचे शिक्षण मिळावे

4. 73 व्या घटनादुरूस्तीला संवैधानिक दर्जा कोणत्या साली मिळाला?
   a) 1947 b) 1950
   c) 1992 d) 2000

5. महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीत महिलांसाठी किती जागा राखीव असतात.
   a) 27% b) 50%
   c) 33% d) 67%

6. ग्रामपंचायतीचा सभासद होण्यासाठी किमान वय किती असणे अपेक्षित आहे.
   a) 18 b) 21
   c) 25 d) 35

7. उपसरपंचाचा कार्यकाल किती वर्षाचा असतो?
   a) 3 b) 4
   c) 5 d) 6

8. पंचायत समितीमध्ये महिलांसाठी किती % जागा राखीव असतात?
   a) 27% b) 12%
   c) 50% d) 33%

9. जिल्हा परिषदेवर इतर मागासवर्गीयांसाठी किती % आरक्षण असते?
   a) 27% b) 33%
   c) 50% d) 67%

10. जिल्हा परिषदेच्या निवडणूकीत उभे राहण्यासाठी किमान वय किती असावे लागते.
   a) 18 b) 21
   c) 25 d) 35

11. भारताची अर्थव्यवस्था कोणत्या प्रकारची आहे?
   a) भांडवलशाही
   b) समाजवादी
   c) मिश्र
   d) यापैकी एकही नाही

12. भारतात आतापर्यंत किती पंचवार्षिक योजना राबवल्या गेल्या आहेत?
   a) 10 b) 11
   c) 12 d) 13

13. खालीलपैकी कोणते भारतीय नियोजनाचे उद्धिष्ट नाही?
   a) आर्थिक वृद्धी b) स्थैर्यासह आर्थिक विकास
   c) आधुनिकीकरण d) बेरोजगारी वाढवणे

14. 1943 साली आठ उद्योगपतींनी आर्थिक विकासाची योजना तयार केली ती कोणत्या नावाने ओळखली जाते?
   a) मुंबई योजना b) गांधी योजना
   c) जनतेची योजना d) उद्योगपतींची योजना

15. Planned Economy for India हा अर्थशास्त्र विषयक ग्रंथ कोणी लिहिला?
   a) पंडित नेहरू
   b) श्री. एम. स्वामीनाथन
   c) श्री. एम. विश्वैखरैया
   d) श्री. रामलु

16. भारतीय नियोजन आयोगाचे अध्यक्ष कोण असतात?
   a) राष्ट्रपती b) पंतप्रधान
   c) अर्थमंत्री d) गृहमंत्री

17. स्वतंत्र भारतातील सर्वोच्च न्यायालय कधी स्थापण्यात आले.

a) 15 ऑगस्ट 1947

b) 26 नोव्हेंबर 1949

c) 26 जानेवारी 1950

d) 1 जानेवारी 1951

18. भारतीय संविधानाच्या कोणत्या कलमात सर्वोच्च न्यायालयाची तरतूद करण्यात आली आहे?

a) 123 b) 124

c) 226 d) 227

19. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश वयाच्या कितव्या वर्षापर्यंत आपल्या पदावर राहू शकतात?

a) 58 b) 60

c) 62 d) 65

20. सर्वोच्च न्यायालयातील न्यायधीशांच्या पात्रतेसाठी उच्च न्यायालयात कमीत कमी किती वर्षे न्यायाधीश म्हणून काम केलेले असावे लागते?

a) 5 b) 10

c) 15 d) 20

21. सर्वोच्च न्यायालयाच्या पुनर्निर्णयाच्या अधिकार क्षेत्रात खालीलपैकी कुठले खटले येतात.

a) संवैधानिक बाबतीत

b) दिवाणी बाबतीत

c) फौजदारी बाबतीत

d) वरीलपैकी सर्व

22. संविधानाच्या कोणत्या कलमात प्रत्येक राज्यासाठी एक उच्च न्यायालय असावे असे नमुद केले आहे?

a) 123 b) 124

c) 214 d) 215

23. उच्च न्यायालयाचे न्यायाधीश वयाच्या कितव्या वर्षापर्यंत पदावर राहू शकतात?

a) 65 b) 62

c) 60 d) 58

24. उच्च न्यायालयातील इतर न्यायाधीशांची संख्या ठरविण्याचा अधिकार कोणाला आहे?

a) राष्ट्रपती b) पंतप्रधान

c) सरन्यायाधीश d) राज्यपाल

25. घटनेच्या कोणत्या कलमानुसार महान्यायवादींची नेमणूक करता येते.

a) 74 b) 75

c) 76 d) 77

26. महालेखापालांचा सेवाकाल किती वर्षांचा असतो?

a) 4 b) 5

c) 6 d) 7

27. महान्यायवादींची नेमणूक कोण करतात?

a) राष्ट्रपती b) पंतप्रधान

c) सरन्यायाधीश d) उपराष्ट्रपती

28. महान्यायवादी वयाच्या कितव्या वर्षापर्यंत पदावर राहू शकतात.

a) 58 b) 60

c) 62 d) 65

29. राज्यसभेची सभासद संख्या किती असते?

a) 250 b) 288

c) 543 d) 552

30. राज्यसभेतील किती सभासद राष्ट्रपती नियुक्त करतात?

a) 10 b) 12

c) 14 d) 16

31. राज्यसभेच्या सभासदाचा कार्यकाल किती वर्षांचा असतो?

a) 4 b) 5

c) 6 d) 2

32. राज्यसभेच्या सभासदाचे वय कमीत कमी किती असावे?

a) 18 b) 21

c) 25 d) 30

33. राज्यसभेचे सभापती कोण असतात?

a) राज्यपाल b) राष्ट्रपती

c) उपराष्ट्रपती d) पंतप्रधान

34. लोकसभेमध्ये राष्ट्रपती किती अँग्लो इंडियन्स सभासदांची नेमणूक करू शकतो?

a) 2 b) 4

c) 12 d) 24

35. भारतीय संविधानाच्या कोणत्या कलमात लोकसभेची तरतूद केली आहे?

a) 76 b) 78

c) 81 d) 92

36. लोकसभेच्या सदस्य पात्रतेसाठी कमीत कमी वय किती असावे?

a) 25 b) 30

c) 35 d) 21

37. लोकसभेच्या दोन बैठकीतील अंतर हे किती दिवसांपेक्षा जास्त नसावे?

a) 120 b) 140

c) 180 d) 220

38. राष्ट्रपतींचे वय कमीत कमी किती वर्षे असावे?

a) 25 b) 30

c) 35 d) 40

39. राष्ट्रपती आपल्या पदाचा राजीनामा कोणाकडे सादर करतात.

a) सरन्यायाधीश

b) उपराष्ट्रपती

c) पंतप्रधान

d) सभापती

40. राष्ट्रपतींना घटनेद्वारे कोणते अधिकार प्राप्त आहेत?

a) कार्यकारी अधिकार

b) कायदेविषयक अधिकार

c) अर्थविषयक अधिकार

d) वरील सर्व

41. राष्ट्रपतीचा कार्यकाल किती वर्षाचा असतो.

a) 4 b) 5

c) 6 d) 7

42. घटनेत राष्ट्रीय आणीबाणी विषयी कोणत्या कलमात नमुद केले आहे?

a) 352 b) 355

c) 356 d) 360

43. राष्ट्रीय आणीबाणी आतापर्यंत किती वेळा लागू झाली?

a) 1 b) 2

c) 3 d) 4

44. लोकलेखा समितीमध्ये एकूण किती सदस्य असतात.

a) 30 b) 22

c) 15 d) 11

45. खालीलपैकी कोणता मूलभुत अधिकार नाही?

a) समतेचा अधिकार b) स्वातंत्र्याचा अधिकार

c) संपत्तीचा अधिकार d) धर्म स्वातंत्र्याचा अधिकार

46. विकास प्रशासनाचे जनक.

a) फ्रेड रिग्ज b) रॉबर्ट डहाल

c) वुड्रो विल्सन d) यु. एल. गोस्वामी

47. चाणक्याने कोणत्या भागात मौर्यकालीन प्रशासनाचे सविस्तर वर्णन केलेले आहे?

a) अर्थशास्त्र

b) वास्तुशास्त्र

c) प्रशासनशास्त्र

d) अर्थसहिता

48. _____ च्या काळात 1772 मध्ये प्रशासनाच्या सोयीसाठी जिल्हा हा प्रशासनाचा घटक म्हणून निर्माण करण्यात आला.

a) वॉरेन हेस्टिंग्ज

b) रॉबर्ट क्लाइव्ह

c) कॉर्नवॉलिस

d) वेलेस्ली

SECTION - B (गुण : 24)

या विभागात एकूण 24 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला एक गुण याप्रमाणे हा विभाग 24 गुणांचा आहे. या विभागाला उणे गुणपद्धत लागू नाही.

एका वाक्यात उत्तरे लिहा.

1. मौर्यकालीन प्रशासन व्यवस्थेची कार्ये कोणत्या दोन विभागात विभागलेली होती?
2. मौर्यकाळात जिल्हाधिकारी समान असलेल्या अधिकाऱ्यास काय म्हणत असत?
3. मध्ययुगीन कालखंडात प्रांतातील लष्कर प्रमुखास काय म्हणत असत?
4. ब्रिटीश कालखंडात संपुर्ण जिल्ह्याच्या प्रशासन प्रमुखाला काय म्हटले जात असे?
5. कलम 13 मध्ये घटनात्मक कायद्याविषयी काय स्पष्ट करण्यात आले आहे?
6. राज्यघटनेच्या कुठल्या कलमामध्ये नागरिकांविषयी मूलभुत कर्तव्ये नमुद केली आहेत?
7. भारतीय राजनीतीची मार्गदर्शक तत्वे आपण कोठून स्वीकारली आहेत?
8. एल.डी.व्हाइट यांनी दिलेली प्रशासनाची व्याख्या कोणती?
9. पीटर ड्रकरच्या मते प्रशासनाचे मूलभुत तत्व कोणते?
10. प्रशासनासंबंधी दोन भिन्न दृष्टिकोन कोणते?
11. फिफनरची प्रशासनाची व्याख्या लिहा.
12. हार्बट सायमन यांची लोकप्रशासनाविषयी व्याख्या लिहा.
13. कोणाला शास्त्रीय व्यवस्थापनाचा जनक असे म्हणतात?
14. मॅक्स वेबरने कोणत्या तीन प्रकारच्या अधिसत्ता अस्तित्वात असतात असे सांगितले आहे?
15. ल्युथर म्युलिक यांच्या मते संघटनेचे चार प्रमुख घटक कोणते?
16. संघटनेत लाइन घटक किंवा लाइन युनिट कोणाला म्हटले जाते?
17. सनद म्हणजे काय?
18. दबाव गट कोणाला म्हणतात?
19. लोकसभेची सदस्य संख्या जास्तीत जास्त किती असु शकते?
20. लोकसभेच्या सभापतींचा कार्यकाल किती असतो?
21. वित्त आयोगाची स्थापना किती वर्षांनी व राज्यघटनेच्या कोणत्या कलमांतर्गत केली जाते?
22. भारतीय संविधानाच्या कितव्या कलमात भारतासाठी एक उपराष्ट्रपती असावा असे म्हटले आहे?
23. लोकसभेच्या कामकाज सल्लागार समितीचे पदसिद्ध अध्यक्ष कोण असतात?
24. ग्रामपंचायत व जिल्हा परिषद यांना साधणारा दुवा कोण आहे?

SECTION - C (गुण : 32)

खालीलपैकी कोणत्याही चार प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे 100 शब्दांत लिहा.

1. धोरण म्हणजे काय? धोरणाचे विविध स्तर किंवा प्रकार लिहा.

2. ल्युथर मुलिक आणि लिंडल उर्विक प्रशासनाची सात तत्वे कोणती?

3. मॅक्स वेबरच्या नोकरशाहीची वैशिष्ट्ये कोणती?

4. विकास प्रशासनाची ठळक वैशिष्ट्ये कोणती?

5. लोकसभेच्या सदस्यांची पात्रता लिहा.